# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०६.०७.२०२६ सोमवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०६.०७.२०२६ रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, नागपुर श्री. शेखर चु. मुनघाटे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ७६५/२०२२ मधील, पोलीस ठाणे पाचपावली येथील अप. क्र. ११५५/२०२२ कलम ३२४, ३०२ भा.दं.वि. या गुन्ह्यातील **आरोपी परसुराम उर्फ तुफान स्वामीदीन ब्राम्हणे वय ३३ वर्षे, रा. लोधनखडाई, पोस्ट बतवारी, तह. मौदा, थाणा मुस्कुर, जि. हमीपूर (उ.प्र.) ह.मु. तनुजा कांबळेच्या घरी किरायाने गल्ली नं. ०४, मांडवकर हॉस्पीटलचे बाजूला, लष्करीबाग, पाचपावली, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये जन्मठेपेची शिक्षा व ५००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.**

वर नमुद आरोपी व मृतक नामे सोनू परसूराम ब्राम्हणे वय ३६ वर्षे हे नात्याने पती पत्नी असल्याने सोबतचे राहत होते. आरोपीचे दुसऱ्या एका महिले सोबत संबंध असल्याचे संशयावरून, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील ह.मु. तनुजा कांबळेच्या घरी किरायाने गल्ली नं. ०४, मांडवकर हॉस्पीटलचे बाजूला, लष्करीबाग, पाचपावली येथे दिनांक १७.०९.२०२२ चे ००.४५ वा. सुमारास, आरोपीचे पत्नीने त्यास विचारणा केली असता, दोघांमध्ये झगडा भांडण झाल्याने, आरोपीने त्याची पत्नी सोनूस घरातील टेबलनी तसेच लाकडी दांड्याने डोक्यावर, चेहऱ्यावर मारून जागीच ठार केले. फिर्यादी सौ. शिल्पा अमित हथगैया, वय ३२ वर्षे, रा. टि.बी. वॉर्ड क्वॉर्टर मेडीकल हॉस्पीटल जवळ ईमामवाडा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे गुन्हा दाखल करण्यात होता. आरोपींना दिनांक १७.०९.२०२२ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन सपोनि. श्री. चंद्रकांत कोसे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती आसावरी परसोडकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. ढाले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ. राजेंद्र मोरई, मपोहवा. अपेक्षा बोदेले यांनी काम पाहिले.

**२) परिमंडळ क्र. ०५ अंतर्गत पोलीस ठाणे हद्दीतील हरविलेले हस्तगत मोबाईल त्यांचे मुळ मालकांना परत:—**

पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५ अंतर्गत पोलीस ठाणे कळमना, यशोधरानगर, पारडी, वाठोडा येथे दाखल असलेल्या हरविलेले मोबाईल तक्रारींचे तपासादरम्यान, कळमना, यशोधरानगर, पारडी, वाठोडा पोलीसांनी तांत्रिक पद्धतीने सिआयआर पोर्टलवरील ट्रॅकींग प्रणाली तसेच, मिळालेल्या स्थानिक माहीतीच्या आधारे बुद्धी कौशल्याने तपास करून तसेच, वेगवेगळ्या ठिकाणी परस्पर जावुन, तक्रारदार अर्जदारांचे हरविलेले एकुण २२१ मोबाईल हस्तगत केले. दिनांक ०६.०७.२०२६ चे १२.३० वा. सुमारास पोलीस ठाणे पारडी येथे हस्तगत केलेले वेगवेगळे कंपनीचे एकुण २२१ मोबाईल किंमती अंदाजे ४१,९८,०५४/— रू. चे मा. श्री. विश्वास नांगरे

पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे हस्ते त्यांचे मुळ मालकांना परत करण्यात आले आहे. याबाबत मोबाईल प्राप्त अर्जदारांचे चेहऱ्यावर समाधान दिसुन आले. सर्व २२१ अर्जदारांनी कळमना, यशोधरानगर, पारडी, वाठोडा पोलीसांचे मन:पुर्वक आभार व्यक्त केले.

सदरची कामगिरी श्री. रोहित ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य.पारडी विभाग) वपोनि. युनुस शेख, प्रविण काळे, प्रमोद कोरे, मवपोनि. नंदा मनघटे, यांचे मार्गदर्शनात पोहवा. महेंद्र, पोअं. कुणाल, धनराज, रमचंद्र, आशिष पिपरहेटे, प्रविंद यांनी केली.

मोबाईल सुपूर्द कार्यक्रमा दरम्यान मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग), मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र ०५), श्री. रोहित ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त, वपोनि. युनुस शेख, प्रविण काळे, प्रमोद कोरे, नितीन चरडे, मवपोनि. नंदा मनघटे, पोउपनि. सचिन धात्रक तसेच, मिसिंग मोबाईलचे मुळ मालक तथा नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागपूर शहर पोलीस दलातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे मोबाईल फोन हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास नजीकच्या पोलीस ठाणे येथे तसेच, सिईआयआर पोर्टलवर तात्काळ नोंदणी करून ब्लॉक करावेत. जेणेकरून त्यांचा मोबाईलचा गैरवापर रोखता येईल तसेच, मोबाईल परत मिळण्यास मदत होईल. त्याचबरोबर प्रतिबंधित तंबाखुजन्य पदार्थाची बेकायदेशीर विक्री करणारे यांचेबाबत डायल ११२ यावर माहिती द्यावी. जनतेच्या हिताकरीता नागपुर शहर पोलीस दल नेहमी सुसज्ज आहे.










**(कामगिरी)**

**एम.आय.डी.सी. पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक ०५.०७.२०२६ चे १९.४५ वा. चे सुमारास, एम.आय.डी.सी. पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, राजीव नगर येथे मंदीराजवळ एक ईसम

येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळुन जावू लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवून, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकुश उर्फ मोठा नरसू विजयसिंग चव्हान वय २४ वर्षे रा. राजीव नगर, झेंडा चौक, हिंगणा रोड, एम.आय.डी.सी. नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कंबरेत एक लोखंडी चाकू किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणून आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२५ दिनांक २४.०४.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगून धूमधाम करीतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे एम. आय.डी.सी. येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपआयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिशकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एम.आय. डी.सी. विभाग) नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. गोकुळ महाजन, सपोनि. गजानन काठेवाडे, पोहवा. दिपक ठाकुर, गजानन राठोड, पोअं. पंकज मिश्रा व विवेक झाडे यांनी केली.

## (गुन्हे)

**पोलीस ठाणे अजनी :— सराफा दुकानात चोरी करणाऱ्या महिला आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी साहील अनिलराव डुंबरे, वय २७ वर्ष, रा. प्लॉट नं. १५, काशी नगर, रामश्वरी मेन रोड, बी. एस.पी. ऑफीस मागे, अजनी, नागपूर यांचे पोलीस ठाणे अजनी हद्दीत, रामेश्वरी मेन रोड, काशी नगर, प्लॉट नं. ११८/ए, शॉप नं. १ येथे साहील ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान आहे. फिर्यादी यांनी दुकानातील दागिन्यांची पडताळणी करण्याकरीता पाहणी केली. त्यांना सोन्याचे दागिने कमी असल्याचे दिसून आले. करीता त्यांनी सी. सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी केली असता, दिनांक २३.०५.२०२६ चे १५.०० वा. ते १८.०६.२०२६ चे १६.०० वा. चे दरम्यान, आरोपी महीला मोनाली प्रमोद कावडकर, रा. ब्रम्ह नगर, बक्सरे यांचे घरी किरायाने, नरसाळा रोड, नागपूर हिने स्वत: करीता सोन्याचे दागीन्यांची ऑर्डर देण्याचे बहाण्यांने दुकानात वेळोवेळी येवून, फिर्यादीचे वडीलांची व दुकानातील महीला कर्मचाऱ्यांची नजर चुकवून सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी १८७.५ ग्रॅम एकुण किंमती १२,७५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले.

या प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. अल्लानूर शेख यांनी महिला आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे कोतवाली :—** सौ. किरण राकेश सुपाटे, वय ३८ वर्षे, रा. शिवाजी नगर, वांढरे आटा चक्की जवळ, कोतवाली, नागपूर ह्या दिनांक १९.०६.२०२६ चे १७.०० वा. पासुन पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांब, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, अंगात— ग्रे रंगाचा सलवार सुट व दुप्पटा घातलेला आहे. भाषा— मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे अजनी</u> :—** सौ. प्रगती गणेश सनेश्वर, वय ३० वर्षे व सोबत मुलगी नामे माही गणेश सनेश्वर, वय ६ वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर, अजनी, नागपूर ह्या दिनांक २६.०६.२०२६ चे ०९.३० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **सौ. प्रगती <u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— कथ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. **<u>माही वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— २ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— काळ्या रंगाची टि—शर्ट व गुलाबी रंगाची लॅगीन घातलेली आहे. भाषा— मराठी बोलते.

**<u>३) पोलीस ठाणे अजनी</u> :—** अभय घनश्याम पंधरे, वय ४५ वर्षे, रा. कोरबा वेस्ट, छत्तीसगढ, ह.मु. चंद्रमणी नगर बांधकाम साईडवर, अजनी, नागपूर हे दिनांक २५.०६.२०२६ चे ०७.०० वा. पोलीस ठाणे अजनी हद्दीतील बांधकाम साईडवर कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. तसेच मुळ गावी सुध्दा गेले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाची टि—शर्ट व पांढऱ्या रंगाचा हाफ पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/छत्तीसगडी बोलतात.


किरण


प्रगती


माही


अभय

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**